# प्रेसनोट दि. १८.०३.२०२१

श्री. रविंद्र बाळकृष्ण वाघ, वय ५२ वर्ष, विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था दुग्ध अति.कार्यभार जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-२ सहकारी संस्था पदुम यांना १,०५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार हे एका चार्टट अकाऊंटन्सीच्या फर्म मध्ये पार्टनर असून तक्रारदार यांचे फर्मने एका संस्थेचे लेखा परिक्षण केले असून त्याची लेखा परिक्षण फि १०,५०,०००/- रूपये इतकी आहे. सदर लेखा परिक्षण अहवाल जिल्हा विशेष लेखा परिक्षक,सहकारी संस्था पदुम सांगली यांना दि.३१.०१.२०२१ किंवा त्या पुर्वी जाणे अपेक्षीत होते. परंतू मागील वर्षी कोरोना परिस्थितीमूळे तक्रारदार यांचे फर्मकडून सदरचा लेखा परिक्षण अहवाल मूदतीत सादर झाला नाही. त्यामुळे श्री. रविंद्र वाघ, जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग -२ सहकारी संस्था पदुम सांगली यांनी तक्रारदार यांना त्यांचे फर्मचे नाव नाम तालीकेतून न काढण्यासाठी लेखा परिक्षण फि १०,५०,०००/- रूपये च्या १० टक्के रक्कम लाच म्हणून मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.१५.०३.२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १५.०३.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री. रविंद्र वाघ, जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग -२ सहकारी संस्था पदुम सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे फर्मचे नाव नाम तालीकेतून न काढण्यासाठी लेखा परिक्षण फि १०,५०,०००/- रूपये च्या १० टक्के म्हणजेच १,०५,०००/- रूपये लाच मागणी करून दि.१८.०३.२०२१ रोजी आणून देण्यास सांगीतली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर आज दि.१८.०३.२०२१ रोजी जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-२ सहकारी संस्था पदुम या ठिकाणी सापळा लावला असता श्री. रविंद्र बाळकृष्ण वाघ, वय ५२ वर्ष, विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था दुग्ध अति.कार्यभार जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-२ सहकारी संस्था पदुम यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १,०५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. रविंद्र बाळकृष्ण वाघ, वय ५२ वर्ष, विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था दुग्ध अति.कार्यभार जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-२ सहकारी संस्था पदुम यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक,श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार, अविनाश सागर, संजय संकपाळ, सलीम मकानदार, सुहेल मुल्ला, भास्कर भोरे, प्रितम चौगुले, राधिका माने, रविंद्र धुमाळ, संजय कलकूटगी, सिमा माने, धनंजय खाडे, श्रीपती देशपांडे, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in